## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / २४० / २०२५ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| मोहन शांताराम येडगांवकर | प्र.सह दुय्यम निबंधक वर्ग २, हवेली क्र.१, यांचे कार्यालय, जि. पुणे २ | १) जिल्हा निबंधक वर्ग १, २) मुद्रांक जिल्हाधिकारी, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय पुणे |

( सुनावणी दिनांक - १७ / ०३ / २०२६ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. १४.०१.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| १४.१०.२०२४ | दस्त क्रमांक १००७७ / १९६३ मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, "दस्त मिळाला नाही."

जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, "अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०६.११.२०२४ रोजीच्या पत्राने अपिलार्थी यांना उपलब्ध असलेल्या माहितीचे शुल्क कळविले आहे."

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, "जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०६.११.२०२४ रोजीच्या पत्राने अपिलार्थी यांना उपलब्ध असलेल्या माहितीचे शुल्क कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिल अर्जावर सुनावणी घेऊन दि. १८.१२.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दस्ताची प्रत तीन आठवड्यात देण्यात यावी," असा निर्णय पारित केला. तथापि अपिलार्थी यांना अद्याप दस्त प्राप्त झाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग २, हवेली क्र.१, यांचे कार्यालय, जि. पुणे २ यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेल्या, दस्ताचा शोध घेऊन उपलब्ध माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावा.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१, मुद्रांक जिल्हाधिकारी, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय पुणे, जि. पुणे यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. २४० / २०२५ / पुणे 2618 / 2026 दिनांक - 5/6/2026.

रामाआ-पुणे/२०२६ /AMC